## ANNEXURE - E

M C.C.1408(Legal)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/---११५८---/-२०१४-१५ दिनांक :- १९/०७/२०१४

प्रति,
अधिकार पत्रधारक - मे. अक्षरशांती रिअलटर्स प्रा.लि.
द्वारा - वास्तुविशारद - मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - मिरा सर्वे क्र./ हिस्सा क्र. नवीन १२/१ जुना १४१/१ या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.२७/०५/२०१४ चा अर्ज.
२) मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील १०(३), १०(५) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.३००/- च्या स्टँम्प पेपरवर दि.०८/०३/२०१३ रोजीचे शपथपत्र.
३) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-४८०/२००८, दि.०६/०९/२००८.
४) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/१२४०/२०१३-१४, दि.१५/०३/२०१४ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.
५) दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/एनओसी/५०५/२०११, दि.०९/०५/२०११ अन्वये नाहरकत दाखला.
६) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" (M.M.R.D.A.) यांचेकडील पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-१९३/१३/९०, दि.०४/०३/२०१३ अन्वये सुधारीत रेखांकन मंजूरी (Location Clearance) व MMRDA/RHD/RHS-१९३/१३/१३७, दि.२०/०३/२०१३ अन्वये मुदतवाढ.
७) पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. एसईअेसी/२२१२/सी.आर.-३१/टीसी-२, दि.२८/०४/२०१४ अन्वयेचा नाहरकत दाखला.
७) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/८८५/२०१३-१४, दि.१०/०६/२०१३ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

## -: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :-

(फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – मिरा सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. नवीन १२/१ जुना १४१/१ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.

२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

..१..

Scanned with OKEN Scanner

CC/485/Legal

जा.क्र. मनपा/नर/ ११५७१/२०१७-१८ दि. १८/०५/२०१८.

२९) यापूर्वी पत्र क्र. ______________ दि. ________ अन्वये /यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादित ठे वून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

(A) SALE COMPONENT BUILDING

| अ.क्र. | इमारत प्रकार | संख्या | तळ + मजले | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | अे | १ | पार्ट तळ + पोडियम + २२ | ७८२५.५० |
| २ | बी | १ | स्टिल्ट + पोडियम + २२ | ५४८८.८२ |
| ३ | सी | १ | स्टिल्ट + पोडियम + २२ | ५४८८.८२ |
| ४ | डी | १ | स्टिल्ट + पोडियम + २२ | ७८२५.५० |
| ५ | ई | १ | स्टिल्ट + पोडियम + २० | ३४८७.५६ |
| | | | एकूण बांधकाम क्षेत्र | ३०११६.२० चौ.मी. |

(B) M.M.R.D.A. RENTAL BUILDING

| अ.क्र. | इमारत प्रकार | संख्या | तळ + मजले | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| ८ | आर-१ | १ | पार्ट तळ + १९ पार्ट | १००८३.५७ |
| | | | जास्तीचे बाल्कनी क्षेत्र | १४९.३२ |
| | | | एकूण बांधकाम क्षेत्र | ४०३४९.०९ चौ.मी. |

३०) यापुर्वीचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/८८५/२०१३-१४, दि.१०/०६/२०१३ अन्वये देण्यात आलेली मंजुरी रद्द करण्यात येत आहे.

३१) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच अग्निशमन व्यवस्था करणे व अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३२) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापुर्वी प्रती सदनिका १०० लिटर या क्षमतेची सौर उर्जा वरिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटिंग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३३) भोगवटा दाखल्यापूर्वी वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३५) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तींची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३६) भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अतिरिक्त सोईसुविधा शुल्कबाबतचे धोरण निश्चित झाल्यास उक्त शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहिल.

३७) भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेतील इमारतीचे काम प्रथम प्राधान्याने चालू करणे व त्याअनुषंगीक इमारती पूर्ण करणे बंधनकारक राहिल. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निर्देशाप्रमाणे कामाची प्रगती, कामाची गुणवत्ता इ. ठेवणे बंधनकारक राहील.

३८) भोडतत्वावरील गृहनिर्माण योजनेबाबत शासनाकडून धोरण बदल / निर्देश असल्यास तसेच पर्यावरण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निर्देश असल्यास त्याप्रमाणे रेखांकन / बांधकाम नकाशे सुधारीत करणे बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

८५५४

दस्त क्र. ९६८५४/२०१४

०२ | ८०

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CL.2, THANE No.4 * DIST. THANE *

३९) इरादापत्र (Location Clearance) साठीची मुदतवाढ सादर करणे व त्यामधील अटीशर्तींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

४०) M.M.R.D.A. यांच्या निर्देशाप्रमाणे Sale Component च्या इमारतीसाठी जोत्याच्या वरिल बांधकामाबाबतचे स्वतंत्र आदेश प्राप्त करुन घेणे बंधनकाराक राहिल.

४१) इरादापत्र (Location Clearance) मधील अटीशर्तींचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

४२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये भोगवटा दाखला घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

४३) इमारत पुर्ण झाल्यानंतर बांधकाम परवानगी मधील नमुद अटी व शर्तीचे पालन केल्याशिवाय बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व भोगवटा दाखला देण्यात येणार नाही. अटींची पुर्तता न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये विकासकावर गुन्हा नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मनपा/नर/१५८४/२०१४/१५

दि. १८/०७/२०१४.

(signature) ०२.०८.१४

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर.

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१) प्रभाग अधिकारी
   प्रभाग कार्यालय क्र. ०६

२) कर निर्धारक व संकलक अधिकारी
   कर विभाग

टनन ४

दस्त क्र. १६८८५/२०१४

७३ | ८५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CL-2, THANE No. 4 * DIST. THANE *
वर्ग-२ ठाणे क्र. ४
ठाणे

Scanned with OKEN Scanner